Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४५ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.५ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# रायडर चिकनकर दापत्यांची दुचाकीने ६ राज्यात भ्रमंती

## ४ हजार ८०० किलोमिटरचा पूर्ण केला प्रवास;शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुखांनी केला सत्कार



**वरोरा | प्रतिनिधी**

येथील रॉयल रायडर क्लबच्या सदस्य असलेले चिकनकर दापत्यांनी स्वतःच्या दुचाकीने ४ हजार ८०० किलोमीटरचा साहसी प्रवास करून ६ राज्यात भ्रमंती करत तेथील इतिहासिक,धार्मिक व नैसर्गिक ठिकाणी भेट देऊन देशातील विविधतेने नटलेल्या संस्कृतीचे दर्शन घेतले. त्यांच्या या साहसी भ्रमंतीबद्दल शिवसेना ( उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी चिकनकर दापत्यांनचा सत्कार केला.

जगातील प्रत्येक देशाला आपला असा इतिहास व संस्कृती असते. तसेच एकाच देशातील वेगवेगळ्या राज्यांनाही आपला इतिहास असतो आणि देशातील वा राज्यांमधील नागरिकांना आपल्या इतिहासाचा जाज्वल्य अभिमान असतो. या इतिहासांशी निगडित प्राचीन वास्तू, राजवाडे, किल्ले, जलदुर्ग, स्मृतिस्थळे, धार्मिक स्थळे त्या देशांमध्ये व राज्यांमध्ये भग्नावस्थेत किंवा क्वचितच चांगल्या अवस्थेत अस्तित्वात असतात. या ऐतिहासिक स्थळांना भेट द्यायला व राष्ट्राभिमान दाखवायला सर्वांनाच खूप आवडत असते. ऐतिहासिक वस्तू जतन करणाऱ्या संग्रहालयांना भेट देणे, हासुद्धा एक आवडता छंद असतो.असाच काहीसा छंद जोपासत वरोरा शहरातील रॉयल रायडर क्लबचे सदस्य असलेले मनोज चिकनकर व त्यांच्या पत्नी मानसी चिकनकर यांनी वरोरा शहरातून आपल्या भ्रमंतीला सुरुवात करत नांदेड, अक्कलकोट, मालवण, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू व तेलंगणा या राज्यात स्वतःच्या दुचाकीने प्रवास करत भ्रमंतीचा छंद जोपासला आहे. चिकनकर दापत्यांच्या साहसी भ्रमंतीचे वरोरा वासियांकडून कौतुक होत आहे.शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे व त्यांची पत्नी रीमा जिवतोडे यांनी मनोज चिकनकर व मानसी चिकनकर यांचा सत्कार केला. यावेळी समस्त शिवसैनिक उपस्थित होते.



# भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या वाढदिवसानिमित्त नोंदणी शिबिर

**पुलगाव | प्रतिनिधी**

भाजपा ओबिसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते यांच्या वाढदिवसानिमित्त पुलगाव येथे भाजपा ओबिसी मोर्चा पुलगाव तर्फे प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना व आयुष्यमान भारत नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १७ सप्टेंबर ला विश्वकर्मा जयंतीच्या दिवशी पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांना त्यांचा व्यवसाय सुरु करण्याकरिता व वाढविण्याकरिता प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांची नोंदणी करुन त्याना अद्यावत प्रशिक्षण देऊन व्यवसाय सुरु करण्याकरिता लागणारे साहित्य खरेदी करण्याकरिता १५ हजारची मदत देण्यात येईल व नंतर बँके मार्फत १ लक्ष रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. अशा या सर्वसामान्य जनतेच्या लाभाची योजना जनतेपर्यंत पोहोचावी व त्याचा लाभ त्यांना मिळावा यादृष्टीने हा



कार्यक्रम घेण्यात आला. सोबतच आयुष्यमान भारत विमा योजनेचे कार्ड सुध्दा वितरित करण्यात आले. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेमध्ये २३५ लोकांची नोंद करण्यात आली व आयुष्यमान भारत विमा योजनेचे २२० कार्ड वितरित करण्यात आले. संजय गाते यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी सकाळपासूनच कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी होती.गावातील व बाहेरगावातील विविध संघटनांचे पदाधिकारी भेटीला आले होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता ओबिसी मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, शहर अध्यक्ष संदीप बोरकुटे, शकील खान, चंद्रकांत शहाकर, अनिल लेकरवाळे, राजेश गुप्ता, सीए ज्ञानेश्वर कुंभारे, चंद्रशेखर बेले, प्रशांत लोणकर, अमित देशमुख, राजू राऊत व ओबिसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# खा.अशोक नेते यांच्या गाडीला नागपूरजवळ अपघात

**गडचिरोली | प्रतिनिधी**

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार तथा भाजपच्या अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते शनिवारी नागपूरवरून गडचिरोलीच्या दिशेने येत असतांना विहिरगांवजवळ त्यांच्या गाडीला अपघात झाला. यात गाडीचे थोडे नुकसान झाले असले तरी कोणालाही दुखापत झालेली नाही. आपण सुखरूप असल्याचे खा.अशोक नेते यांनी सांगितले.खा.नेते मुंबईवरून रात्री १२.१५ च्या सुमारास नागपूरला पोहोचल्यानंतर सकाळी ते आपल्या वाहनाने (एमएच ३३, एए ९९९०) गडचिरोलीकडे निघाले होते. सकाळी १०.२० वाजताच्या सुमारास उमरेड मार्गावरील विहिरगांवजवळ समोरच्या ट्रकने अचानक वळण घेतले. त्यामुळे त्या ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या खा.नेते यांच्या वाहनचालकाने गाडीवरील नियंत्रण सुटू न देता तातडीने ब्रेक लावले. पण त्या प्रयत्नात ट्रकच्या एका कॉर्नरला मागून हलकीशी धडक बसली. त्यात खा.नेते यांच्या वाहनाचे थोडे नुकसान झाले. मात्र नेते यांच्यासह त्यांच्या वाहनातील कोणालाही इजा झाली नाही,यानंतर दुसऱ्या वाहनाने खा.नेते गडचिरोलीकडे निघाले. गडचिरोलीत पोहोचल्यानंतर ते आपल्या मतदार संघातील नियोजित दौऱ्यासाठीही रवाना झाले. दरम्यान या अपघाताची माहिती मिळताच अनेकांनी खा.नेते यांना फोन करून त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. ईश्वरी कृपेने कोणालाही दुखापत झालेली नाही असे खा.नेते यांनी सांगितले.

# खासदार सुनील मेंढेच्या उपस्थितीत विमानतळ सल्लागार समितीची बैठक

**भंडारा | प्रतिनिधी**

गोंदिया येथील बिर्सी विमानतळ येथे आज विमानतळ सल्लागार समितीची बैठक खासदार सुनील मेंढे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.

विमानतळ आणि त्या अनुषंगाने असलेल्या विविध अडचणी आणि समस्यांच्या संदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली. १ डिसेंबर पासून इंडिगो एअरलाइन्स च्या माध्यमातून गोंदिया हैदराबाद ही प्रवासी वाहतूक विमान सेवा सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. या नवीन उड्डाणाबद्दल असलेल्या नियोजनाची माहिती घेत खासदारांनी समाधान व्यक्त केले. विमानतळासाठी जमीन अधिग्रहित केल्याने निर्वासित झालेल्या व अजूनही भूखंडाचे विक्रीपत्र हाती न पडलेला १०६ कुटुंबांचा प्रश्न चर्चेत आला. या भूखंड धारकांना तत्काळ विक्रीपत्र करून देण्यात यावे आणि त्या जागेत सर्व सुविधा देत विकास केला जावा, असे निर्देश खासदारांनी दिले. अन्य जागेच्या



संदर्भात असलेल्या काही प्रश्नांवर चर्चा झाली. त्यावर तोडगा काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. विमानतळाच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या जुन्या कामगारांना नवीन कंत्राटदाराने कामावर घेतले नाही. त्या जुन्या कामगारांना तात्काळ कामावर घेण्यात यावे, असे निर्देश दिले. विमानतळ प्रशासनातील ए पी डी हे व्यवस्थित काम करीत नसल्याने त्यांच्याबद्दल अविश्वास व्यक्त केला. सोबतच काम करत नसतील तर याची दखल घेऊन तत्काळ त्यांचे स्थानांतरण करण्यात यावे असे निर्देशही यावेळी खासदार सुनील मेंढे यांनी दिले. यावेळी आमदार विनोद अग्रवाल, राजकुमार कूथे, विजयजीत वालिया, नांदूजी बिसेन, गजेंद्र फुंडे, अधिकारी शफीक शाह, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, कार्यकारी अभियंता सा बा विभाग लभाने, सरपंच संतोष सोनवणे, उपसरपंच उमेश पांडेले, रवी तावाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळेल-उदय सामंत

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील लॉयड्स मेंटल स्पेन आर्यन अँड पॉवर कंपनीने आपल्या विस्तारीकरणासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित केल्या आहेत. या जमिनींचे मोबदला शेतकऱ्यांना कवडीमोल भाव देण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या आहेत. या संदर्भात

चंद्रपूरचे काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांनी मुंबई येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळेल असे आश्वासन दिले.मंत्री सामंत म्हणाले की, कंपनीची सखोल चौकशी केली जाईल. चौकशीतून जे काही तथ्य समोर येतील त्यानुसार योग्य कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळेल याची खात्री करून घेऊ, असे त्यांनी सांगितले.चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कंपनीकडून मिळालेला मोबदला कमी असल्याचा आरोप केला आहे. कंपनीने त्यांना



कवडीमोल भाव दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनावर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवला आहे. कंपनीची चौकशी करून योग्य कारवाई होईल अशी त्यांना आशा आहे.

# जलचर आधारित उपजीविकेच्या संधी या विषयावर जलजीविका संस्थेची कार्यशाळा

**वर्धा | प्रतिनिधी**

जलजीविका हि एक नोंदणीकृत अशासकीय संस्था आहे जी लहान आणि अल्पभूधारक शेतकरी आणि मत्स्य व्यवसायधारक यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दिशेने काम करते. जलजीविका संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलकंठ मिश्रा यांच्या संकल्पनेतून जलचर आधारित उपजीविकेच्या संधी या विषयावर सेवाग्राम येथील यात्री निवास येथे दिनांक २ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचा उद्देश उपजीविका क्षेत्रात विदर्भातील काम करणाऱ्या संस्थांचे पदाधिकारी यांना जलचर आधारित उपजीविकेच्या संधी विषयक जागरूकता निर्माण करणे, प्रदेशात विद्यमान जलसंचय, तंत्रज्ञान आणि इकोसिस्टम डेव्हलपमेंट मॉडेलच्या माध्यमातून उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, जलस्रोतांची उत्पादक क्षमता वाढवणे, ग्रामीण भागातील स्थलांतर कमी करणे आणि मत्स्यव्यवसाय मूल्य शृंखलेत उपजीविकेच्या संधींचे स्तर निर्माण करणे हा होता. सदर कार्यशाळेला विदर्भातील वर्धा, अमरावती, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ अशा पाच जिल्ह्यातील उपजीविकेच्या संबंधित काम करणाऱ्या एकूण १३ संस्थांच्या ५५ प्रतिनिधिंनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेला पदमाकर बसवंत, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा यांनी प्रामुख्याने हजेरी लावली आणि मत्स्यशेती करण्याचे महत्व व मत्स्य शेती अंतर्गत जलजीविका संस्थेनी केलेली तांत्रिक मदत तथा शेतकऱ्यात मत्स्यशेती विषयक जागरूकता निर्माण केल्याबद्दल संस्थेचे कौतुक केले. सत्राच्या प्रास्ताविक व कार्यशाळेचे महत्व समीर परवेज, मत्स्यव्यवसाय सल्लागार, जलजीविका पुणे यांनी सांगितले. प्रथम सत्रात प्रियंका झोड, प्रशिक्षण समन्वयिका, जलजीविका यांनी गोड्या पाण्यातील मत्स्यशेती, गोड्या पाण्यातील संसाधनाचे महत्व, मत्स्यशेतिचे आधुनिक तंत्रज्ञान या विषयांबद्दल माहिती दिली तर अंकिता पाटील, प्रकल्प विकास अधिकारी, जलजीविका यांनी एकात्मिक मत्स्यशेती (कृषी आधारित मत्स्यपालन व पशूंसह मत्स्यपालन) या विषयावर संबोधित केले. या नंतर प्रधानमंत्री मत्स्य



संपदा योजनेबद्दल समीर परवेज, मत्स्यव्यवसाय सल्लागार, जलजीविका यांनी सखोल माहिती दिली. दुपारच्या सत्रात बँक ऑफ इंडिया, वर्धाचे जिल्हा अग्रणी व्यवस्थापक चेतन शिरभाते यांनी मत्स्यव्यवसाय विभागासाठी उपलब्ध असलेल्या किसान क्रेडिट कार्ड या योजनेबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या संस्थापैकी काही संस्था (एन.जी.ओ.) चे प्रतिनिधी यांनी सुद्धा मत व्यक्त केले. यात मुख्यत: किशोर जगताप (मिशन समृद्धी, वर्धा), स्विटी मुनेश्वर (बायफ फाऊंडेशन, वर्धा), अनिल पेंदाम (नवनिर्माण संस्था, यवतमाळ), प्रकाश नवघरे (युवा रुरल असोसिएशन, नागपूर), अजय सहारे ( एस टी आर सी गडचिरोली), स्वप्नील नागोसे (अॅक्शन अगेन्स्ट हंगर, अमरावती) इत्यादींनी त्यांच्या-त्यांच्या संस्थेची माहिती सांगितली व कार्यशाळेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. या नंतर प्रसाद राजगुरू, विक्री आणि विपणन समन्वयक, जलजीविका यांनी मत्स्यव्यवसाय करताना उद्योजक विकास कसा करता येईल यावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला जास्तीत जास्त संस्थाना जोडण्याचे महत्वाचे कार्य गणेश तूळसकर, समुदाय विकास अधिकारी, जलजीविका व सोबतच सुहेल रामटेके, विभागीय मत्स्यव्यवसाय समन्वयक, जलजीविका यांनी केले यांनी केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती पुसदकर, प्रशासन समन्वयक, जलजीविका व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुहेल रामटेके, विभागीय मत्स्यव्यवसाय समन्वयक, जलजीविका यांनी केले यांनी केले. सदर कार्यक्रम पदमाकर बोजा, प्रकल्प संचालक, जलजीविका यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला विशेष सहकार्य दामीनी अखंड, सुजाता बैस, रेमा तावडे यांचे लाभले.

# शोधू आत्मनिर्भरतेच्या वाटा

स्वतःची आणि स्थानिक उत्पादनसाधनांशी नाळ जोडणारी भक्कम उद्योगव्यवस्था तयार करून जागतिक पुरवठा साखळीचा एक महत्त्वाचा घटक होणे; केवळ तेवढेच नव्हे तर त्या संदर्भात नेतृत्व तयार करणे, म्हणजे आत्मनिर्भर होणे. त्या दृष्टिकोनातून भारताच्या यासंदर्भातील वाटचालीचा वेध.




जसे पूर्ण 'परावलंबित्व' घातक तसेच पूर्ण स्वावलंबित्वदेखील मारक. कारण ते अव्यवहार्य. ह्या दोहोंच्यामधली समतोलाची आणि अधिक सशक्त स्थिती म्हणजे 'आत्मनिर्भरता' किंवा 'मेक इन इंडिया'. यात नेमके अपेक्षित तरी काय आहे?स्वतःची आणि स्थानिक उत्पादनसाधनांशी नाळ जोडणारी भक्कम उद्योगव्यवस्था तयार करून जागतिक पुरवठा साखळीचा एक महत्त्वाचा घटक होणे; नव्हे तर त्या संदर्भात नेतृत्व तयार करणे, म्हणजे आत्मनिर्भर होणे.स्थानिक उद्योग बळकट करत असताना परकी कंपन्यांचं स्वागत केलंत तरी हरकत नाही. परकी भांडवल वापरले तर त्यात गैर नाही. वेगवेगळ्या देशांशी मुक्त व्यापार केलेत तर उत्तमच! आत्मनिर्भरतेत आपल्या उद्योगांचा पाया भक्कम करताना हेही अपेक्षित आहे.मात्र 'संरक्षक नीती'चे धोरण थोडे बाजूला ठेवायला हवे. बाल्यावस्थेतले उद्योग मात्र अपवाद. भरमसाठ आयातकरांना सोडचिठ्ठी, व्यापारावरची नियंत्रणे शिथील करणे, किंमतयुद्ध ह्यासारख्या प्रतिकूल गोष्टींना थारा न देणे, हे आहे आत्मनिर्भरतेचं स्वरूप. हे सारे साध्य करत असताना 'आयात पर्यायतेचे' उद्दिष्ट गाठणे हे आलेच.भारताचे हे आत्मनिर्भरतेचे स्वप्न कसं पूर्ण होणार? हे स्वप्न ज्या निरनिराळ्या आणि 'मूलभूत आर्थिक सुधारणांच्या' वाटांनी पूर्ण होईल त्यात 'इझ ऑफ डुइंग बिझनेस', 'जीएसटी', 'एफडीआय', पायाभूत सेवांमधील मोठी गुंतवणूक, आयबीसी 'पीएम गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन', 'लॉजिस्टिक पॉलिसी' आणि निवड उद्योगांची प्रॉडक्शन लिक्ड इन्सेटिव्ह स्कीम (पीएलआय) ह्यासारख्या वाटांचा समावेश होतो.ह्या आत्मनिर्भरतेच्या स्वप्नात अशीही अपेक्षा आहे, की भारतीय उद्योग जगामध्ये पाचव्या स्थानावरून किमान चौथ्या स्थानावर यावा; अगदी तिसरे स्थान नजिकच्या काळात शक्य नसले तरी. मात्र, एक गोष्ट खरी.देशांतर्गत साधनांच्या वापरात काटकसर आणूनही जागतिक दर्जाची गुणवत्ता गाठून उत्पादनाच्या काही क्षेत्रांमध्ये 'विशिष्ट आकारमान' (स्केल) गाठण्याचा प्रयत्न करणे, हा आत्मनिर्भरतेचा कार्यक्रम असायला हवा. ह्यालाच 'फ्रुगल इंजिनिअरिंग' आणि 'फ्रुगल इनोव्हेशन' म्हणतात.इंडस्ट्री-४ ह्या संकल्पनेत असलेली 'नवीन औद्योगिक क्रांती' आत्मनिर्भरतेच्या परिमाणाला पूरक ठरेल. उत्पादन आणि औद्योगिक प्रक्रियेत 'डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उद्योगाचा पाया सशक्त होऊन उत्पादनाचे आकारमान वाढेल.उदाहरणार्थ औद्योगिक 'आयओटी नेटवर्क्स, एआय, बिग डेटा, रोबोटिक्स, ऑटोमेशन यासारख्या किती तरी गोष्टी! उद्योगाची कार्यक्षमता वाढवणे, स्थानिक रोजगारात भर टाकणे, भारतात परकी गुंतवणूक वाढवणे आणि आयातीत घट घडवून भारतीय उद्योगाला वैश्विक करणे या उद्दिष्टांसाठी 'पीएलआय योजना' आत्मनिर्भरतेच्या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा हिस्सा म्हणून एप्रिल २०२० मध्ये सुरू झाली.सुरवातीला तीन कार्यक्षेत्रांपासून १४ कार्यक्षेत्रांपर्यंत या योजनेची व्याप्ती वाढली. सरकारने त्यासाठी अर्थसंकल्पात १.९७ लाख कोटी रुपयांची तरतूदही केली. मोबाईल, टेलिकम्युनिकेशन, औषधउद्योग, वाहनांचे सुटे भाग, धवल वस्तू ह्यांसारख्या उद्योगांत ३.६५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून त्यासाठी एकूण ७३३ नवीन अर्जांना मान्यता देण्यात आली आहे.गेल्या दोन वर्षात 'पीएलआय योजनेचा' परिणाम म्हणून भारताच्या निर्यातीत इलेक्ट्रॉनिक्स, टेलिकम्युनिकेशन वस्तू आणि अन्नप्रक्रिया वस्तूंच्या समावेशात वाढ होताना दिसते आहे. पारंपारिक निर्यात वस्तूंच्या तुलनेत हा बदल आश्वासक आहे.या योजनेच्या कार्यक्षेत्रातील उद्योगांमध्ये परकी प्रत्यक्ष गुंतवणूक वाढत आहे. उदाहरणार्थ, औषधे, अन्नप्रक्रिया उद्योग, वैद्यकीय साधनांच्या निर्यातीत अनुक्रमे ४६, २६ आणि ९१ टक्क्यांची मूल्यवृद्धी झाली आहे. ह्या योजनेचे खूप मोठे यश मोबाईल फोन कार्यक्षेत्रात दिसून येते.
उत्पादनात 'स्थानिकीकरण' मोलाचं
फॉक्सकॉन, विस्ट्रॉन, पेगाट्रॉन ह्या स्मार्टफोन कंपन्यांनी भारतातली पुरवठासाखळी मजबूत केल्याने अधिक आधुनिक स्मार्टफोनचे उत्पादन भारतात सुरू झाले. त्यामुळे बॅटरी, लॅपटॉपसारख्या उद्योगातील वस्तूंच्या उत्पादनात 'स्थानिकीकरण' मोलाचं ठरू पाहत आहे.गेल्या तीन वर्षांत मोबाईल फोन उद्योगात २० टक्क्यांची मूल्यवृद्धी झाली आहे. त्याचप्रमाणे इलेक्ट्रॉनिक उद्योगात २०१३-१४ च्या तुलनेत २३ टक्क्यांची भर पडली आहे. या योजनेने देशांतर्गत उद्योगांच्या स्थानिक मूल्यवृद्धीत लक्षणीय वाढ घडवून आणली आहे.उदाहरणार्थ गेल्या पाच वर्षांत एअरकंडिशनिंग वस्तूंच्या उत्पादनात २५ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे दिसते. 'पीएलआय योजनेचा' परिणाम म्हणून दूरसंचार उद्योगाने ६० टक्के 'आयात पर्यायतेचे' लक्ष्य गाठलेले आहे. त्याचप्रमाणे 'ड्रोन' तयार करण्याच्या उत्पादनप्रक्रियेत भारतीय स्टार्ट अपनी मोठी उडी घेतली आहे.आत्मनिर्भरतेच्या ह्या प्रवासात 'पीएलआय' योजनेत काही स्पष्ट उणीवाही आहेत. निरनिराळ्या कार्यक्षेत्रांच्या दृष्टीने 'प्रोत्साहन' म्हणून जो निधी वाटायचा, त्यासाठी विभागपरत्वे ठरवून दिलेले निकष संदिग्ध आहेत.उत्पादनखर्च, तंत्रज्ञान, नवीन रोजगाराच्या संधी, निर्यात ह्या गोष्टींबाबत अचूक व मध्यवर्ती आकडेवारी उपलब्ध नाही. त्यामुळे वेगवेगळ्या योजनांचे मूल्यमापन करताना प्रशासकीय अडचणी येतात.'पीएलआय' योजना मोठ्या व भांडवलप्रधान उद्योगांना प्रोत्साहननिधीच्या वाटपात झुकते माप देते. उदाहरणार्थ इलेक्ट्रॉनिक्स, वाहनउद्योग इ. याउलट श्रमप्रधान उद्योगांकडे डोळेझाक केली जाते.उदाहरणार्थ चर्मोद्योग, कापड, खेळणी उद्योग इ. 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम' आकाराच्या उद्योगांचे निर्यात आणि रोजगारनिर्मितीतील योगदान निःसंदिग्ध असूनदेखील 'पीएलआय' योजनेने या उद्योगाला हवे तितके महत्त्व दिलेले दिसत नाही.या योजनेने हेही ध्यानात घ्यायला हवे, की आर्थिक अनुदानाधारित उद्योगांची संख्या भरमसाठ आकारानं वाढायला नको. ह्यातून आर्थिक परावलंबित्व वाढत जाऊन पुढे भविष्यात आर्थिक प्रोत्साहनाचा हात मागे घेतला तर ह्या उद्योगांची कार्यक्षमता कमी होऊन उत्पादकता कमी होण्याचा धोका संभवतो.त्यामुळे एकूणच औद्योगिक उत्पादन घसरण्याची भीती आहे. या योजनेने, उद्योगाचा पाया विकसित व्हावा म्हणून आर्थिकेतर घटकांचा खोलवर पद्धतीने विचार केलेला नाही. उदाहरणार्थ, कच्च्या मालाचा सातत्याने होणारा पुरवठा बाजारातल्या स्पर्धात्मक किमती इ. उदाहरणार्थ 'कॉर्टनस्टील' ह्या कंटेनरच्या उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची भारतातील प्रतिकिलोमागची किंमत चीनपेक्षा जास्त आहे.'पीएलआय योजनेखाली येणाऱ्या प्रत्येक कार्यक्षेत्राची व उद्योगाची प्रगती सारखीच झालेली नाही. त्यामुळे सर्वच कार्यक्षेत्रांच्या गरजांचे स्वरूप सारखेच आहे, हे गृहितक वास्तव नाही. उदाहरणार्थ औषध उत्पादनक्षेत्र आणि वस्त्रोद्योगांच्या उद्योगांच्या गरजांचे स्वरूप भिन्न आहे.म्हणून आत्मनिर्भरतेचे एक साधन म्हणून या योजनेचा हेतू जरी चांगला असला तरी योजनेच्या रचनेतील दोष दूर करायला हवेत. भारताच्या आत्मनिर्भर प्रवासाचा पल्ला दूरचा आहे. हा मार्ग अधिक सुकर करायचा असेल, तर उद्योगाच्या प्रगतीसाठी 'वैश्विक विचार' असायला हवा.नसीम निकोलस ह्यासाठी 'अँटी फ्रजाइल' ही संज्ञा वापरतात. ह्याचा अर्थ 'विकारातून देखील आकार निर्माण करण्याची क्षमता.' भारतीयांची कार्यक्षमता कमी साधनांमध्ये अधिक निर्माण करण्याची आहे (रेनॉल्ट, अध्यक्ष २००६). पण केवळ आत्मनिर्भरतेचे स्वप्नरंजन नको; डोळस वृत्तीने आणि आश्वासक कार्यपद्धतीने आत्मनिर्भरतेचा शोध घ्यायला हवा.

# सर्च-रिसर्च : जिवाणूंसाठी क्रिस्पर तंत्र!

जनुकांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी अधिक जलद आणि कमी खर्चिक पद्धत म्हणजे 'क्रिस्पर'. क्रिस्पर म्हणजे 'क्लस्टर्ड रेग्युलर इंटरस्पेस्ड शॉर्ट पॅलिनड्रोमिक रिपीट्स'. सदोष जनुकांमुळे निर्माण होणारे आजार दूर करण्यासाठी, भविष्यात ही पद्धत मोठ्या प्रमाणावर वापरली जाऊ शकते.क्रिस्पर तंत्र जितके अचूक होतेय तितके त्याद्वारे जिवाणूंकडून होणाऱ्या विविध क्रियांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयोग चालू आहेत. जिवाणूतील 'पेप्टाइडस'वर याचा अधिक भर आहे. मानव आणि इतर सस्तन प्राण्यांमध्ये प्रथिननिर्मिती दोन अर्ध अंडाकृती रायबोसोम कोशिकांगाद्वारे होते. जिवाणूतही रायबोसोमचा असाच वापर होतो, त्याखेरीज काही पेप्टाइडसची गरज ते रायबोसोमऐवजी विशिष्ट विकरांच्या क्रियांनी पूर्ण करतात. 'नॉन रायबोसोमल पेप्टाइड सिंथटेज' हा विकरांचा वैशिष्ट्यपूर्ण वर्ग पेप्टाइड बंध निर्माण करतो. ही पेप्टाइडस जिवाणूंच्या प्रतिकारशक्तीची एक फळी आहे. या छोटेखानी पेप्टाइडसच्या रचना वैशिष्ट्यपूर्ण असतात. यातील अमिनो आम्ले 'डी' रचनेची, चक्राकार आणि विविध रासायनिक गट जोडलेली असतात.जैविक पर्याय म्हणून या रंगद्रव्याकडे पाहिले जाते. याचा उपयोग खाद्यपदार्थांपासून वस्त्रोद्योग, चर्मोद्योग अगदी बांधकामातील रंगकामासाठीही होऊ शकतो. इंडिग्वाइडिनची निर्मिती दोन ग्लुटामिन मिनो आम्लांपासून होते. जिवाणूतील या रंगद्रव्याचे प्रमाण सीमित असते. ते मोठ्या प्रमाणात वाढवायचे असेल तर जिवाणूमधील जैविक क्रियांची पुनर्बांधणी आवश्यक असते. क्रिस्पर तंत्राची मदत त्यासाठी घेतली जाते. आत्तापर्यंत जिवाणूतील एखाद्या रेणूचे उत्पादन वाढवायचे असेल तर एकेक जनुक निष्क्रिय करुन ते अजमावले जायचे. यात खूप वेळ जायचा. सध्याच्या 'क्रिस्पर आरएनए इंटरफरन्स' तंत्राने योग्य ते जनुक निष्क्रिय करता येते. एकाच वेळेस अनेक जनुकांना लक्ष्य करुन हव्या त्या रेणूचे उत्पादन एकाच टप्प्यात वाढवायचा यशस्वी प्रयत्न संशोधकांनी केलाय. अमेरिकेतील बर्कले प्रयोगशाळेंतर्गत जॉइंट बायोएनर्जी इन्स्टिट्यूटमध्ये दिपान्विता बॅनर्जी आणि सहकाऱ्यांनी जमिनीत आढळणाऱ्या 'स्यूडोमोनास पुटिडा' या जिवाणूत आवश्यक त्या जनुकांचे रोपण करुन आणि इतर चौदा जनुकांची पुनर्बांधणी करुन इंडिग्वाइडिन रंगद्रव्याची विक्रमी निर्मिती केली आहे! भाकित केलेल्या पातळीपेक्षा पन्नास टक्के अधिक उत्पादन त्यांना मिळालंय. हे करताना त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा आणि त्याबरोबर संगणकाच्या अल्गोरिदमचा वापर केला.त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष नोव्हेंबरच्या 'नेचर कम्युनिकेशन्स' या संशोधन पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत. इंडिग्वाइडिन तयार होताना ग्लुटामिन या आधार द्रव्याचा इतर क्रियात होणारा वापर त्यांनी मूळ जनुकांचे संपादन करुन रोखला. कुठल्या जनुकांचे संपादन करायचे ते अल्गोरिदमने निश्चित केले. तंत्राने एवढे मोठे आयोजन करुन ते यशस्वी होते की नाही याची त्यांना शंका होती. पण वाढीव इंडिग्वाइडिनच्या निर्मितीमुळे त्यांचे तंत्राचे व्यवस्थापन योग्य होते याची खात्री त्यातून झाली. नव्या पेप्टाइडसच्या निर्मितीसाठी आणि आहे त्या पेप्टाइडसच्या वाढीव उत्पादनासाठी क्रिस्पर तंत्र, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संगणक अल्गोरिदम या तीन गोष्टी एकत्र करुन होणाऱ्या किमयेमुळे संशोधकांची नवीन जैविक रसायने बनवण्याची भूक वाढली आहे. पुढच्या संशोधनात आयसोपेंटेनॉल हे जैवइंधन बनवण्याचे आणि नायलॉनसारख्या वस्त्रोद्योगातल्या पदार्थांना जैविक पर्याय निर्माण करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. वैद्यकीय क्षेत्रात पर्यायी प्रतिजैविके तयार करण्याचे प्रयत्न अनेक ठिकाणी सुरू आहेत. सध्या क्रिस्पर तंत्र मानवी व्याधीवर उपचार म्हणून सुरक्षित नाही; पण जिवाणूत त्याचा वापर निर्धोक आणि किफायतशीर ठरतो.

# अधिकारी, साहित्यिक आणि हम करे सो...

सरकारी समित्यांवर काम करणाऱ्या साहित्यिक, विचारवंत यांना त्यांचे काम करताना पूर्णपणे मोकळीक देणे आवश्यक असते.



शासनातील अधिकारवैभव आणि साहित्यसंस्था यांच्यातील तणावांची चर्चा हल्ली रंगत आहे. हे असे घडू नये आणि ज्या-त्या क्षेत्रांतील स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्याला धरून असणारी निर्णयप्रक्रिया अबाधित राहावी, याबद्दल कुठलाच कुणाला संदेह नसावा. राज्य शासनाधीन साहित्य, संस्कृतीसंबंधीच्या संस्थांवर अधिकार मंडळाची एक प्रकारची मालकशाही वाढत असल्याच्या बातम्या काही आठवडे झळकल्या. त्या एकुणात अस्वस्थ करणाऱ्याच म्हटल्या पाहिजेत.साहित्यसंस्था, त्यावर काम करणारे विचारवंत, कवी, लेखक, प्रतिभावंत हे आपली मतं प्रकट करावयास तथा कार्य करावयास सर्व काळात स्वतंत्र असले पाहिजेत, याबद्दल मतभेद असता कामा नये. याकामी, यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्य, संस्कृतीविषयीच्या आस्थेचा आणि त्यांनी साहित्य संस्थांसंबंधी मांडलेल्या भूमिकांचा दाखला सत्वर दिला जातो. तो यथार्थच आहे. खुद्द डॉ. सदानंद मोरे यांनीही यशवंतराव चव्हाण आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या त्या-त्या वेळी मांडलेल्या ध्येय-धोरणांची साक्षेपाने मांडणी केल्याचे वाचकांनी वाचलेले आहे.आज आपण याचा विचार जरूर करायला हवा आणि शासन दरबारी जे हल्ली काहीबाही घडते आहे; त्यावर मतं, भूमिका स्पष्ट करायलाच हव्यात. जसे की, शासनाचे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार, साहित्यसंस्थांमधील वाढता, जाचक हस्तक्षेप, साहित्यिकांच्या, अध्यक्षपदांच्या नेमणुका, वर्णी लावण्यासंबंधी पुढारीवर्गाचे हस्तक्षेप याबद्दल समाज अलीकडेच एवढा उलटसुलट का बोलतो आहे?याआधी हे वातावरण इतके गढूळ नव्हते, याचीही मीमांसा करायला हवी. मागच्या वर्ष-दोन वर्षांत विविध समित्यांवर कामं करणाऱ्या विविध अध्यक्षांनी दिलेले राजीनामे, या सगळ्या घटना सहज सोडून देण्यासारख्या मुळीच नाहीत. मुळात कुणाचाही स्वाभिमान दुखावता कामा नये. गौरवांत कसूर होता कामा नये, हा सांस्कृतिक चलनवलनाचाच भाग असतो.एकंदर शासन पातळीवरून साहित्यसंस्थांवर साहित्यिकांच्या निवडी करताना त्या-त्या व्यक्तीचे, त्या क्षेत्रातील काम यांचे तोलमाप होऊन नेमणुका झाल्या पाहिजेत, हे एक सत्य मोजलेच जावे. ते शक्यतो पाळले जातेही. शिवाय अशा साहित्यसंस्थांवर नेमणूक करताना शैक्षणिक अर्हतेसारखी नोकरीप्रधान अट नसते. ती मुळीच महत्त्वाची नाही.डॉ. सदानंद मोरे यांच्यासारखी संतवाङ्मयांतील व्यासंगी, समाज, संस्कृती, साहित्यासंबंधी भाष्य करणारी व्यक्ती एखाद्या वा अनेक महत्त्वपूर्ण समित्यांच्या प्रमुखस्थानी असणं, ही बाब शासनासाठीही भूषणावह आहे. शिवाय, डॉ. मोरे यांनी समाजाच्या जागरणासाठी जी पायाभूत ग्रंथनिर्मिती केली, त्यांच्यासंबंधीचा दाखला त्यांच्याविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट करणारा असाच आहे.मग, अशी व्यक्ती जेव्हा सडेतोड, ठाम भूमिका घेत आपली नाराजी शासकीय अधिकारशाहीबद्दल प्रकट करते तेव्हा त्यातले तथ्य-सत्य जनतेनेही समजून घेतले पाहिजे, इतकाच त्याचा अर्थ आहे. शिवाय, कोणीही हे अमान्य मुळीच करणार नाही की, शासनाच्या धोरणांचा स्वीकार ही बाब लोकशाही तत्त्वमान्य अशीच आहे. ती कोणीच नाकारलेली नाही.मात्र, साहित्यसंस्थांवर नेमलेल्या साहित्यिक, विचारवंत, भाषाचिंतक, कलावंत, प्रतिभावंत, भाषातज्ज्ञ यांचे असणारे विहित अधिकार मान्यच. ''आम्ही म्हणू त्याप्रमाणे बदल व्हावेत आणि अशा प्रक्रियेमध्ये नेमलेल्या सन्माननीय साहित्यिकांनी काही बोलायचे नाही...''हा दृष्टिकोन अस्वस्थ करणारा आहे. शिवाय, अशा गोष्टी एक प्रकारे उपकारजन्यतेला पूरक ठरतात. यातले इंगित समजून घेतले पाहिजे. कारण उपकार मोठे झाले की, सन्मानांची पायमल्ली होणारच असते.हे पण समजून घ्यायला हवे की, साहित्यात, भाषेत, समाजांत, संस्कृतीमध्ये काय नवे सामील करावयाचे, वर्तमान आणि भविष्यदृष्ट्या लोकोपयोगी काय नवे आणायचे; हा सगळा भाग त्या-त्या समित्यांवर कार्य करणाऱ्या ज्या-त्या जबाबदार साहत्यिक, विचारवंत, कलावंत यांचा आहे. तोही त्यांना मोकळेपणाने करू द्यावा. शिवाय, शासनस्तरावर त्याला पूर्णतः हिरवा झेंडा दाखवावा.तिथे, कोणत्याही समितींमधील काम करणाऱ्या लेखकवर्गांचा अथवा विचारवंतवर्गांचा उपमर्द होता कामा नये. त्यांना सन्मानाने वागवले पाहिजे; हा शासन काय किंवा समाज काय, दोहोंसाठीही शिष्टाचाराचाच भाग. परंतु, हे शिष्टाचार नीट पाळले जात नसावेत. त्यातून उमटणारी नाराजी किंवा राजीनामासत्र उभे राहाते. कुठे झालेच असेल गढूळ तर ते निर्मळ करता यायला हवे.या एकूण स्पष्टीकरणाला जोडूनच अजून एक बाब कमी महत्त्वाची गणली जाते आणि ती म्हणजे, समित्यांच्या बैठकांसाठी देण्यात येणारे मानधन तसेच असणाऱ्या सुविधा, लेखकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि एकुणात सरकारी कागदांच्या गर्दीत जुन्या नियमांमध्ये तुटपुंजे मिळणारे भत्ते याबद्दल अनेकदा पुष्कळ लेखकांनी नाराजी प्रकट केली आहे.समित्या असो अथवा समित्यांबाहेर असणारे साहित्यिक कलावंत असोत, त्यांचा यथामूलक सन्मान होणे; हे शासन दरबारीही सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन सौहार्दतेचे लक्षण आहे. म्हणजे, लेखक-विचारवंतांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. सारांश त्यांच्या वैचारिक, वाङ्मयीन योगदानाची उत्तम पद्धतीने कदर व्हावी, यात गैर ते काय? योग्य पद्धतीने केल्या जाणाऱ्या सन्मानांची अपेक्षा बाळगणे यात चुकीचे काहीही नसते!हे पण सत्य की, वस्तुतः कोणत्याही साहित्याची संस्कृती ही ज्या-त्या समकालीन समाजाचे प्रतिनिधित्व करणारी असते. जनतेमधूनच लेखक येत असतात. ते समाजाच्या आवाजाला धरून चालतात, बोलतात, लिहितात. हे सगळे 'चालणे-बोलणे-लिहिणे' यावर सरकारचे जाणवणारे नियंत्रण कोणीही मान्य करणार नाही. कारण लेखक नावाची व्यक्ती राजकारणी नसते. त्यांचे म्हणणे राजकारणावरची प्रतिक्रिया असू शकेल.पण 'तुम्ही निमूट गप्प राहा'' असा फतवा कोणत्याच सरकारला लेखकांबद्दल कधीच काढता येत नसतो. हे जगभराच्या कितीतरी दाखल्यांमधून अनेकदा अनेकांनी दाखविलेले आहे. त्यामुळे सरकारे येतात आणि जातात. साहित्यिक आणि त्यांचे लेखन मात्र सतत काळासमवेत या समाजासोबत स्वतःच्या पावलांनी, स्वतंत्र विचारांनी चालत असते.हे भान म्हणा किंवा आत्मभान म्हणा; नियंत्रित करू पाहणाऱ्या कुठल्याही यंत्रणेला असलेच पाहिजे. अन्यथा समिती नावाला उरेल. सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन विधायक काहीच घडणार नाही.तात्पर्य, या सगळ्यांमधला सरळ, साधा न्याय इतकाच की ज्यांचे काम त्यांना करू दिले पाहिजे. कारण ज्या-त्या क्षेत्रामधली जी-ती सन्मान्य, ज्ञानी व्यक्ती असते. शासनाने त्यांची भूमिका, अधिकाऱ्यांनी त्यांचे काम त्यांच्या चौकटीत राहून जरूर करावे. अर्थात तसे ते केले जातेही. मात्र, जिथे लेखकांचे काम आहे तिथे ते त्यांना पूर्ण अधिकाराने, शिवाय समुचित सन्मानाने करू दिले पाहिजे.कारण, यात मूल्यविचार असतो आणि स्वातंत्र्याची किंमतही ठळक असते. लेखक हे कोणी दुय्यम आहेत या मनात बसलेल्या धारदार धारणा पूर्णतः बाजूला सारल्या पाहिजेत. तरच, साहित्याचाही उत्कर्ष होईल आणि साहित्यिकांचा योग्य गौरव होईल. समित्या, विविध मंडळांची कामं अधिक विधायक, अधिक समाजाभिमुख आणि खरंतर अधिक सांस्कृतिक निरामयतेच्या अंगाने पुढे जातील.

# सुंदरम नगरचा जलतरण तलाव बंद जेष्ठ नागरिक,जलतरणपटूंचा संताप




**सोलापूर । प्रतिनिधी**

विजयपूर महामार्गावरील सुंदरम नगर येथील जलतरण तलाव मागच्या अनेक दिवसांपासून बंद आहे. परिणामी जलतरणपटू आणि पोहण्याचा शोक असणाऱ्यांची गैरसोय झालीआहे. खास करून राज्य, राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धांचा सराव करणाऱ्या जलतरणपटूंची मोठी अडचण निर्माण झाली.त्यातून सरावाअभावी त्यांचे नुकसान होत आहे. महापालिका आणि जिल्हा क्रीडा प्रशासन यांच्या वादात अडकलेला हा तलाव तत्काळ चालू करण्याची आग्रही मागणी जुळे सोलापूर परिसरातील संबंधितांची आहे.विशेषत्वे, या जलतरण तलावासंदर्भात महापालिका वा जिल्हा क्रीडा प्रशासन शिवाय लोकप्रतिनिधी यांच्याकडून कोणतीच कारणे नकोत, पहिल्यांदा तलाव सुरु करा, असे नागरिकांचे म्हणणे आहे.सोलापूर शहरात महापालिकेच्या नियंत्रणाखालील पार्क चौकातील स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अशोक नगर परिसरातील श्री. मार्कंडेय असे दोन जलतरण तलाव आहेत. जुळे सोलापूरकरांच्या हक्काचा सुंदरम नगर येथील जलतरण तलाव हा जिल्हा क्रीडा विभाग प्रशासनाच्या मालकीचा आहे.तथापि, सुंदरम नगरातील जलतरण तलाव हा महापालिका आणि जिल्हा क्रीडा प्रशासन यांच्या वादात अडकला आहे. गेल्या पाच वर्षांपासून हा जलतरण तलाव महापालिकेच्या नियंत्रणाखाली होता.मात्र, या तलावाला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने शिवाय त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याने त्याच्या देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च महापालिकेच्या आवाक्याबाहेर असल्याची भूमिका महापालिकेची आहे. त्यातून महापालिकेने या जलतरण तलावाचे हस्तांतरण जिल्हा क्रीडा विभागाकडे केले. जिल्हा क्रीडा विभागाकडून या तलावाची योग्य पद्धतीने यापूर्वी आणि आतादेखील देखभाल होत नाही. या तलावासंदर्भात महापालिकेकडे बोट दाखवून जिल्हा क्रीडा प्रशासन जबाबदारी झटकून मोकळे होत असल्याचे सांगितले जात आहे.सुंदरम नगर येथील जिल्हा क्रीडा विभागाचा जलतरण तलाव हा जुळे सोलापूरसह विजापूर रोड परिसरातील नागरिकांच्या हक्काचा आहे. तथापि, हा महापालिका आणि जिल्हा क्रीडा विभाग यांच्या अंतर्गत सुरू असलेल्या वादात जलतरण पटूंचे नुकसान होत आहे. शिवाय पोहण्याच्या हौशी लोकांची हौसदेखील पूर्ण होत नाही.विद्यार्थी मासिक - ४०० रुपये, विद्यार्थी वार्षिक - २००० रुपये, व्यावसायिक मासिक १०० रुपये, व्यावसायिक वार्षिक ५००० रुपये, पंचवार्षिक २० हजार रुपये, दहा वर्षासाठी - ३८ हजार रुपये, असे शुल्क आहे. त्याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी एकूण शुल्कावर ५० टक्के सूट आहे.या शुल्कानुसार, अनेकांनी यापूर्वी पास काढले आहेत. मात्र, सुंदरम नगर जलतरण तलाव अचानक बंद करण्यात आला. त्यामुळे पास आहे, पण पोहायचे कुठे? असा प्रश्न सराव करणाऱ्या जलतरणपटूंसह पोहण्याच्या हौशींना पडला आहे.

## कंत्राटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी काम बंद आंदोलन

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध विभागात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे राज्यस्तरावर बेमुदत काम बंद आंदोलन सुरू आहे .त्याला पाठिंबा देण्यासाठी सांगोला ग्रामीण रुग्णालयातील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत काम बंद आंदोलनाचे निवेदन वैद्यकीय अधीक्षक कार्यालयात देण्यात आले. वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गेल्या वीस वर्षापासून तुटपुंज्या मानधनावर काम करत आहेत. आझाद मैदानावर पार पडलेल्या आक्रोश मोर्चामध्ये आरोग्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन लेखी स्वरूपात जोपर्यंत प्राप्त होत नाही ,तोपर्यंत काम बंद आंदोलन सुरू ठेवण्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे. इतर राज्यामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन केले आहे. त्याच पद्धतीने राज्य शासनाने देखील लवकरात लवकर समायोजन करण्याचा निर्णय घ्यावा व समान काम समान वेतन देण्यात यावे अशी मागणी कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या काम बंद आंदोलनाचा फटका रुग्णसेवेला बसणार आहे.... यावेळी राष्ट्रीय बाल



स्वास्थ्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप शेडगे, डॉ. प्रथमेश लोहकरे, डॉ.सय्यद, डॉ. देवदत्त पवार, डॉ.सुशीलकुमार शिंदे ,डॉ. निखत इबुसे ,डॉ. सुषमा फाटे, डॉ. विदुला बाड ,आयुष् वैद्यकीय अधिकारी डॉ. जावळे, औषध निर्माता अधिकारी श्री. समाधान शिवशरण ,श्री .सचिन कांबळे, श्री .जगदीश पाडवी, अमृता रसाळ ,नाझिया मुजावर ,एएनएम. सुधा गायकवाड, सिंधू सरगर, जयश्री जगदाळे, रेश्मा वाघमारे ,अश्विनी काशीद, एनसीडी जीएनएम रविता कोकणे ,एमबीयुएस च्या जी एन एम . मयुरी उगडे, रंजना पावरा, आरसीएच च्या एएनएम शहनाज खलिफा, सुषमा आलदर, अंजली दंडवते, पुष्पा पाटोळे, एक्स-रे टेक्निशियन श्री. ओंकार कोरे आदी उपस्थित होते.

## उद्योगपती मुकेश अंबानी यांना सातत्याने धमक्या

**मुंबई**–उद्योगपती मुकेश अंबानी यांना धमकीचे ईमेल पाठवल्याप्रकरणी तेलंगणातील १९ वर्षाच्या तरुणाला शनिवारी पहाटे मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीची ओळख गणेश रमेश वनपारधी असे केली असून त्याला ८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि उद्योगपती मुकेश अंबानी यांना सातत्याने धमक्या येत आहेत. वृत्तानुसार, अंबानींच्या मेल आयडीवर ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर रोजी एक ई-मेल आला होता. यामध्ये ४०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मागण्या पूर्ण न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. असे पाच ई-मेल आठवडाभरात त्यांना आले आहेत. सर्व धमक्या एकाच मेल आयडीवरून आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यापूर्वी मुकेश अंबानी यांना २७, २८ ऑक्टोबर आणि ३० ऑक्टोबरला धमक्या आल्या होत्या.देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि उद्योगपती मुकेश अंबानी यांना पुन्हा जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. या आधी २७ आणि २८ ऑक्टोबरला धमक्या मिळाल्यानंतर मुकेश अंबानींना सोमवार ३० ऑक्टोबरला पुन्हा धमकी मिळाली होती. त्या वेळी गामदेवी पोलिसांनी सांगितले की, सोमवारी सकाळी मुकेश अंबानी यांना त्यांच्या कंपनीच्या मेल आयडीवर एक ई-मेल आला. यामध्ये ४०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. मागण्या पूर्ण न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे सांगण्यात आले होते.शुक्रवार २७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी याच मेलवर २० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती आणि शनिवारी २८ ऑक्टोबर रोजी २०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. देशाच्या सर्वोत्तम नेमबाजांकडून त्यांना मारले जाईल, असे मेलमध्ये म्हटले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याच अकाउंटवरून आलेल्या मेलमध्ये 'आमच्या ईमेलला कोणतेही उत्तर आलेले नाही, त्यामुळे आता ही रक्कम २०० कोटी रुपये आहे, जर ती मिळाली नाही तर डेथ वॉरंटवर स्वाक्षरी करा,' असे लिहिले आहे. यापूर्वी २७ ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या पहिल्या धमकीच्या ईमेलमध्ये 'तुम्ही आम्हाला २० कोटी रुपये दिले नाहीत तर आम्ही तुम्हाला मारून टाकू, आमच्याकडे भारतातील सर्वोत्तम नेमबाज आहेत', असे लिहिले होते.

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा आदित्य ठाकरेंच्या मतदार संघात दौरा


**मुंबई**–महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज आदित्य ठाकरे यांच्या मतदार संघाचा दौरा केला. या दौऱ्यात राज ठाकरे यांनी वरळी बीडीडी चाळ येथे भेट दिली. तसेच स्वतः बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाची पाहणी केली. हा आमदार आदित्य ठाकरे यांचा मतदार संघ असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पुतण्याच्या मतदारसंघात 'काका'ची एन्ट्री झाल्याने या परिसरात या दौऱ्याचीच चर्चा होती. राज ठाकरे यांनी स्वतः वरळीतील बीडीडी चाळ पुनर्विकास ठिकाणी पाहणी केली. या बीडीडी चाळीचे सध्या काम सुरू आहे, या कामाची पाहणी स्वतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. वास्तविक राज्य सरकारच्या वतीने वरळी बीडीडी चाळीचा पुनर्विकास केला जात



आहे. यात स्थानिक नागरिकांच्या आणि व्यापाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात समस्या आहेत. या समस्या घेऊन अनेकदा बीडीडी शाळेतील रहिवाशी आणि व्यापारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीला गेले होते. त्या नंतर राज ठाकरे यांनी या परिसरात भेट देऊन पाहणी केली आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज वरळी बीडीडी येथील स्थानिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी वरळीत पोहोचले. ठाकरेंनी पुनर्विकास प्रकल्पाची पाहाणी केली. तसेच, परिसरातील नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या. दरम्यान, वरळी बीडीडी, नायगाव बीडीडी आणि ना. म. जोशी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास राज्य सरकारकडून करण्यात येत आहे. या ठिकाणच्या रहिवाशंनी राज ठाकरे आल्यानंतर मोठी गर्दी केली होती. तसेच येथील स्थानिकांनी राज ठाकरेंकडे अनेक तक्रारीही केल्या आहेत.

## केंद्र सरकारकडून कोल्हापूरकरांना दिवाळी भेट:पीएम ई बस सेवा प्रकल्पाअंतर्गत कोल्हापूर महापासाठी शंभर ई बसेस मंजूर

**कोल्हापूर**–केंद्र सरकारच्या विशेष समितीने पीएम ई बस सेवा प्रकल्पाअंतर्गत कोल्हापूर महापालिकेसाठी शंभर ई बसेस मंजूर केल्या आहेत. येत्या दोन महिन्यात या बसेस कोल्हापूरमध्ये दाखल होतील. कोल्हापूरला ई बसेस मिळाव्यात या माझ्या प्रयत्नांना यश आल्याचे आत्मिक समाधान असल्याचे खासदार धनंजय महाडिक यांनी सांगितले. या संदर्भात माहिती देण्यासाठी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. कोल्हापूर शहरातील रस्ते दर्जेदार हवेत म्हणून केंद्र सरकारने १०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. येत्या हिवाळी अधिवेशनामध्ये आणखी ९० कोटी शहरातील रस्त्यासाठी मंजूर होतील, अशी माहिती देखील खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.'केएमटी ही कोल्हापूरच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा आहे. एकदम शंभर बसेस मंजूर झाल्यामुळे शहराची



सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट होणार आहे. शिवाय प्रवाशांना चांगली सेवा मिळणार आहे. रस्त्यांसाठी मंजूर झालेल्या निधीमुळे कोल्हापूर शहरातील रस्ते एकदम चकाचक होतील.' असे मत यानिमित्ताने घेतलेल्या पत्रकार परिषदेत खासदार धनंजय महाडिक यांनी मांडले.वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडविणारी ही दिवाळी भेट कोल्हापूरला दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी आभार मानले. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील यांचे मोलाचे सहकार्य याकामी लाभले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी माजी आमदार अमल महाडिक, माजी नगरसेवक प्रा. जयंत पाटील, सत्यजित कदम, भाजपचे माजी महानगर अध्यक्ष महेश जाधव, राहुल चिकोडे, अध्यक्ष विजय जाधव, माजी नगरसेवक रशीद बारगीर आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांचे कुटुंब ड्रग्ज व्यवहारात सहभागी आहे का?:खा.संजय राऊत

**मुंबई**–नशेसाठी सापाचे विष आणि मुली पुरवल्याबद्दल बिग बॉस ओटीटी-२ चा विजेता एल्विस यादव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा यादव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानावर गणपतीची पुजा, आरती कसा करतो? असा सवाल उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अनेक प्रश्न उपस्थित केला आहे.एल्विस यादव प्रकरणावरुन संजय राऊत यांनी जोरदार हल्ला चढवला. शिंदेंच्या राजकीय परिवारची ड्रग्ज प्रकरणात चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली. या प्रकरणात एनसीबी काय करत आहे? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात माफियागिरी वाढली असून त्यांचे केंद्र मंत्रालयातील सहाव्या मजल्यावर असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. इतकेच नाही तर आता हे लोन वर्षा बंगल्यापर्यंत पोहोचले असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमित शहा यांनी



या प्रकरणाची उत्तरे द्यावी, असे आवाहन देखील संजय राऊत यांनी केला आहे.या व्यक्तीला वर्षा बंगल्यावर कुणी आमंत्रित केलं होतं? मुख्यमंत्र्यांच्या निवासाशी त्याचा काय संबंध आहे? मुख्यमंत्र्यांचं कुटुंब किंवा मुख्यमंत्र्यांचे राजकीय कुटुंब ड्रग्ज व्यवहारात सहभागी आहे का? असे अनेक प्रश्न या वेळी खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केले आहेत.बिग बॉस ओटीटी-२ चा विजेता एल्विस यादव याला मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी घेऊन जाणारा खासदार देखील ड्रग्ज घेतो अशी आपल्याकडे पक्की माहिती असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. त्याची माहिती तुम्ही देता का मी देऊ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तुम्ही तोंड उघडा नसता मी तोंड उघडले तर तुमचे तोंड देखील बंद होईल, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.नशेसाठी सापाचे विष आणि मुली पुरवल्याबद्दल बिग बॉस ओटीटी-२ चा विजेता एल्विस यादवसह ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नोएडामध्ये एका रेव्ह पार्टीवर पोलिसांनी छापा टाकून ९ साप ताब्यात घेतले. याप्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे. तर एल्विसच्या शोधासाठी तीन पथके तैनात केली आहेत. नोएडा पोलिसांनी शुक्रवारी नोंदवलेल्या एफआयआरमध्ये म्हटले आहे की, एल्विस रेव्ह पार्ट्यांमध्ये सापाचे विष व परदेशी मुली पुरवत होता.

## एसटीसेवा पूर्ववत सुरू प्रवाशांमधून समाधान




**पंढरपूर :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे- पाटील यांनी गुरुवारी (ता. २) राज्य सरकारशी झालेल्या वाटाघाटीनंतर आपले आंदोलन २ जानेवारीपर्यंत मागे घेतले आहे. त्यामुळे एसटी महामंडळ प्रशासनाने एसटी बससेवा शुक्रवारी (ता. ३) सकाळपासूनच पूर्ववत सुरू केली आहे. दिवाळीच्या तोंडावर बससेवा सुरळीत झाल्याने प्रवाशांमधून समाधान व्यक्त होत आहे.मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही अज्ञात व्यक्तींनी सोमवारी (३० ऑक्टोबर) भंडिशेगाव (ता. पंढरपूर) येथे एसटीची बस पेटवून दिली होती. त्यामुळे एसटी प्रशासनाने बससेवा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. पंढरपूर बस आगारातून मागील काही दिवसांमध्ये एकही बस सोडण्यात आली नव्हती. परजिल्ह्यांतून आलेल्या बस देखील पंढरपूर बस आगारामध्येच थांबवण्यात आल्या होत्या. त्यामुळे श्री विठ्ठल दर्शनासाठी एसटी बसने पंढरपूरमध्ये आलेले भाविक बस स्थानकामध्ये अडकून पडले होते. मात्र, आता मराठा आंदोलन मागे घेण्यात आल्याने एसटी महामंडळाने आपली बससेवा पूर्ववत सुरू केली आहे. ऐन दिवाळी व शाळांच्या सहामाही परीक्षांच्या तोंडावर एसटी सेवा सुरळीत झाल्यामुळे प्रवासी, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.मागील तीन दिवसांमध्ये बसच्या अनेक फेऱ्या रद्द झाल्यामुळे एसटी महामंडळाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. मात्र, आता मराठा आंदोलन मागे घेतल्याने शुक्रवारपासून एसटी सेवा पूर्ववत सुरू झाली आहे.

# उद्योग वाढीसाठी चंद्रपूर येथील मोरवा विमानतळाची धावपट्टी विकसित करा– आ.किशोर जोरगेवार

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मागणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हा औद्योगीक जिल्हा आहे. येथे अनेक उद्योग आहे. त्यामुळे या उद्योगांना पुरक असे नवे उद्योग या जिल्ह्यात उभे राहु शकतात ही बाब लक्षात घेत येथील उद्योग वाढीसाठी चंद्रपूर येथील मोरवा विमानतळाची धावपट्टी व्यावसायिक विमाने उतरण्याच्या दृष्टीने विकसीत करण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई मंत्रालय येथे राज्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली असून या भेटी दरम्यान सदर मागणी केली आहे. या मागणीचे निवेदनही आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना देण्यात आले आहे. यावेळी चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातील इतरही प्रश्नांबाबत आमदार किशोर जोरगेवार यांची राहूल नार्वेकर यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली आहे.

चंद्रपूर हा औद्यागिक जिल्हा असून मोठे वीज निर्मिती प्रकल्प, कोळसा खाणी, लोहखनिज, सिमेंट उद्योग, कागदउद्योग, आयुध निर्माण प्रकल्प, वनसंपत्ती, पर्यटन असे अनेक उद्योग चंद्रपूर येथे आहे. यामुळे या क्षेत्रात अजून नवीन उद्योग आणि कारखाने उभारण्याची क्षमता आहे. या सर्व उद्योगांचे संचालन आणि नियमन मुंबई, नागपूर, दिल्ली, बंगलोर, अहमदाबाद, रायपुर या सारख्या शहरांमधून होत असते. चंद्रपूर व गडचिरोली सारख्या सुदूर व मागास क्षेत्राला जोडण्याकरिता शासनाच्या वतीने १९६७ ला मोरवा या ठिकाणी २२ हेक्टर जागेत विमानतळ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने विमान धावपट्टी विकसित करण्यात आली. सदर विमानतळाची धावपट्टीची लांबी ९०० मीटर व रुंदी २८ मीटर इतकी आहे. त्यामुळे सदर विमानतळ केवळ छोटेखानी विमान उतरण्यासाठी योग्य आहे. तसेच सद्यस्थितीत सदर विमानतळाचा वापर केवळ व्हीआयपीच्या हालचालींसाठी केला जातो.मात्र आता सदर विमान धावपट्टी व्यावसायिक विमान चलन च्या दृष्टीने विकसित केल्यास या विमानतळाचा वापर अधिक योग्य रीतीने केल्या जाऊ शकतो. तसेच नक्षलप्रभावित चंद्रपूर–गडचिरोली जिल्हायाकरिता सद्यस्थितीत केवळ हे एकच विमानतळ आहे. मोरवा येथील धावपट्टी चा विकास आराखडा नुसार व्यवसायिक विमान चालवण्यासाठी योग्य आहे. त्यामुळे राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या व नक्षलप्रभावित चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याला व्यवसायिकदृष्ट्या विमानसेवेने जोडण्यासाठी व येथे नवीन रोजगार निर्मितीसाठी मोरवा, चंद्रपूर विमानतळाची धावपट्टीचा विकास करण्यात यावा अशी मागणी यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

# ओलीतासाठी गोसिखुर्द प्रकल्पाचे पाणी सोडा – शुभम मंडपे



**चिमूर । प्रतिनिधी**

रब्बी हंगामाची सुरुवात झाली असून शेतकऱ्यांनी चणा गव्हाची पेरणी केलेली आहे. अशातच पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर खूप मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला. गोसिखुर्द प्रकल्पाचे कालवे चिमूर तालुक्याच्या काही भागापर्यंत काम झाले असून शेकऱ्यांची अडचण लक्षात घेता वंचित बहुजन युवा आघाडी चे जिल्हाध्यक्ष व आंबोली ग्रा.प. सदस्य शुभम मंडपे यांनी गोसिखुर्द प्रकल्पाचे पाणी बारमाही चालु करावे अशी मागणी चिमूर उपजिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून केली आहे .

त्याच सोबत शेतकऱ्यांना किमान १२ तास दिवसा विजपुरवठा करण्यात यावा.तसेच सोयाबीन उत्पादन सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ मदत जमा करावी अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली .यावेळी निवेदन देतांना वंचित बहुजन युवा आघाडी चे जिल्हाध्यक्ष व आंबोली ग्रा.प. सदस्य शुभम मंडपे, ड. सोंडवले, जिल्हा सल्लागार कांबळे , ड.नागदेवते, शहर अध्यक्ष शालिक थुल, महिला उपाध्यक्षा शीतल सोरदे, वासुदेव गायकवाड, संदीप शंभरकर, निखिल रामटेके,आशिष बोरकर,अस्मित रामटेके, ऋषिकेश मोटघरे, तथागत रामटेके, विनोद येसाबरे, प्रवीण गझभिये, साहिल पठाण, किशोर जांभुळकर, भागवत बोरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नंदवर्धन,चेकदरूरचा भाजपने राखला गढ



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील नंदवर्धन आणि चेकदरूर या दोनही ग्रामपंचायतीवर भारतीय जनता पार्टीची सत्ता प्रस्तापित झाली आहे.भाजपा नेते माजी जि.प.सदस्य अमर बोडलावार यांचे कुशल संघटन आणि मार्गदर्शनाच्या बळावर ही सत्ता कायम ठेवण्यात यश मिळाले आहे.

गोंडपिपरी तालुक्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या नंदवर्धन ग्रामपंचायतीवर काँग्रेसचे वर्चस्व राहिले.तर लगतच्या चेकदरूर ग्रामपंचायतीवर अडीच वर्ष भाजपची सत्ता राहिली.या दोनही ग्रामपंचायतीतील सरपंचानी राजीनामे दिले.यानंतर रिक्त झालेल्या दोनही गावच्या सरपंच पदाच्या निवडी पार पडल्या.यात कुशल नेतृत्व आणि संघटनशक्तीच्या जोरावर विरोधकांना चारी मुंड्या चित करित या दोनही गावात भाजपचे जेष्ठ नेते अमर बोडलावारांनी आपली सत्ता कायम ठेवली आहे.यावेळी नंदवर्धन येथे सुनंदा पारखी तर चेकदरुरच्या सरपंचपदी अमोल भोयर यांची वर्णी लागली.यानंतर गावात विजयी मिरवणूक काढण्यात आली

# ठाकरेंचे कुटुंबीय केदारनाथाच्या दर्शनाला



**मुंबई**–शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे कुटुंब उत्तराखंड दौऱ्यावर आहेत. त्यांनी बद्रीनाथाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासमोर बेळगावमधल्या सीमा भागातील लोकांनी घोषणाबाजी केली. बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशा घोषणा येथील कर्नाटक सीमावासीयांनी दिल्या. इतकेच नाही तर शिवसेनेमध्ये झालेल्या फुटीच्या पार्श्वभूमीवर आम्ही तुमच्यासोबत असल्याच्या घोषणा देखील येथील नागरिकांनी दिल्या आहेत. त्यानंतर आज सकाळी उद्धव ठाकरे हे सहकुटुंब केदारनाथ मंदिरातही दर्शनाला पोहोचले आहेत.उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि पूर्ण कुटुंब कालपासून उत्तराखंड दौऱ्यावर आहेत. उत्तराखंडमध्ये उद्धव ठाकरे यांनी काल बद्रीनाथाचे दर्शन घेतले. या वेळी तेथील नागरिकांनी त्यांचे जोरदार स्वागत कले. उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, तेजस ठाकरे तसेच शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर देखील या दौऱ्यात सहभागी आहेत.बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशी मागणी सीमाभागातील नागरिकांनी या वेळी केली. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत बद्रीनाथ या ठिकाणी, या बाबत घोषणाबाजी करण्यात आली. उद्धव ठाकरे सहकुटुंब आले हे लक्षात येताच त्यांनी 'ठाकरेंच्या' नावाने घोषणा द्यायला सुरुवात केली.

# बेशिस्त वाहनांमुळे रस्त्यावर कोंडी सोलापुरात अनेक ठिकाणी अपघात



**सोलापूर :** स्मार्ट सिटी सोलापूर शहरात बेशिस्त वाहतुकीने नागरिक त्रस्त आहेत. नवीन रस्ते करताना पूर्वीच्या रस्त्याच्या चुकात कोणताही बदल न करता, नवीन रस्ते तयार करण्यात आले. बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.शहरात अरुंद रस्त्यावरील वाहतुकीच्या समस्या अद्याप सुटल्या नाहीत. अशातच उलट दिशेने वाहन चालविणारे दुचाकीस्वार त्यांच्यासह दुसऱ्याच्या जिवालाही धोका निर्माण करतात. सोलापूर शहरात काही मोक्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या बेशिस्त वाहतुकीमुळे कोंडी तर होतेच शिवाय अपघातही होत आहेत. अशातच शहरात रंगभवन ते सातरस्ता चौक, शासकीय विश्रामगृह हा रस्ता शहरातील मध्यवर्ती ठिकाणी जाण्यासाठी मुख्य रस्ता आहे.या रस्त्यावर नेहमी वर्दळ असते. या रस्त्यावर वाहनचालक वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवत वाहने चालवतात. सात रस्ता चौकातील अन्नपूर्णा मिठाईसमोरील एकेरी मार्गातून येणारी वाहने, इंडिया टी जवळ उलट दिशेने येणारी वाहने, शासकीय विश्रामगृह समोरून विजापूर रस्ता आणि होटगी रस्त्यावर येणारी वाहने, शासकीय दूध डेअरीजवळ विजयपूर रस्त्याला उलट दिशेने येणारी वाहने अशा काही ठिकाणांमुळे वारंवार छोटे अपघात होतात. या ठिकाणी पोलिसांकडून कारवाई होण्याची नागरिकांची अपेक्षा आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रात सोशल मिडीया वर औरंगजेबाचे स्टेटस व स्टोरी ठेवणाऱ्यांवर कारवाई करा

## श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव समिती व राष्ट्रीय बजरंग दल आर्वी यांची मागणी



**आर्वी । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रात सोशल मिडीया मध्ये औरंगजेबाचे स्टेटस व स्टोरी ठेवणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतची तक्रार स्थानिक श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव समिती व राष्ट्रीय बजरंग दल आर्वी विधान सभा क्षेत्राच्या वतीने आर्वी पोलीस स्टेशनला देण्यात आली.

श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे व संपूर्ण भारताचे दैवत आहेत. आपला महाराष्ट्र श्री. छत्रपती शिवाजी महाराजाच्या नावाने ओळखला जातो. छत्रपतींचा वारसा घेऊन महाराष्ट्र संस्कृती आणि सामाजिक ऐक्य जपत विकासाची नवी शिखरे गाठत आहे. तोच वारसा घेऊन आर्वीतील नागरिक सुद्धा सामाजिक सलोखा राखत एक्याने गुण्यागोविंदाने राहतात. पण गेल्या काही दिवसांपासून या सामाजिक ऐक्याला व सलोख्याला तडा देण्याचे काम काही समाज कंटकाकडून केला जातो आहे. यातच भर म्हणून काही लोकांनी औरंगजेबाचे स्टेटस सोशल मीडियावर टाकून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. जे लोक औरंगजेबाला आपला आलमगीर म्हणतात. त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. अन्यथा आपल्या आर्वी शहरातील सामाजिक सलोख्याचे वातावरण बिघडण्याची शक्यता आहे. अशा आशयाची तक्रार आर्वी पोलीस स्टेशनला देण्यात आली.

अशा महाराष्ट्र द्रोही विचाराच्या दोषी इसमावर कडक कारवाई करण्याची मागणी स्थानिक श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव समिती व राष्ट्रीय बजरंग दल आर्वी विधान सभा क्षेत्राचे विष्णू प्रसाद भारती यांच्या नेतृत्वात शेकडो युवकांच्या वतीने करण्यात आली.


# माफसु तर्फे कृषि उद्योजकतेवर आधारित विद्यार्थी परिषद आणि प्रशिक्षणाचे आयोजन

**नागपूर । प्रतिनिधी**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या नाहेप–कास्ट प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठातर्फे कृषि उद्योजकतेस चालना : आर्थिक विकासाची व्याप्ती आणि संधी या विषयावर दोन दिवसीय विद्यार्थी परिषद आणि प्रशिक्षणाचे आयोजन नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे दि. ५–६ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले आहे.या देशभरातील २० पेक्षा अधिक कृषि आणि पशुविज्ञान विद्यापीठातील पदव्युत्तर विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होणार आहेत.सदर नाहेप–कास्ट प्रकल्प भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तर्फे महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठास २०१९–२० या वर्षी मंजुर करण्यात आला असुन विद्यापीठातंर्गत असलेल्या मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयात प्राणी अन्न सुरक्षा उन्नत संशोधन केंद्र या नावाने कार्यान्वित आहे.

या परिषद आणि प्रशिक्षणाचे उद्दीष्ट कृषि, पशुविज्ञान व इतर सहयोगी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यामध्ये कृषि उद्योजकतेस चालना, शिक्षणाच्या परिणामकारकतेमध्ये वाढ आणि उद्योग अभिमुखतेस प्रोत्साहन देणे असे आहे. परिषदे दरम्यान खाजगी कृषि आधारित उद्योगातील अधिकारी, विषय विशेषज्ञ, कृषि आधारित स्टार्टअपचे यशस्वी उद्योजक आणि नामांकित कृषि आधारित व्यवस्थापन संस्थांचे अध्यापक हे विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय विद्यार्थी व्यवसाय आधारित प्रश्नमंजुषा, पोस्टर स्पर्धा आणि नाहेप–कास्ट प्रकल्पांतर्गत प्रशिक्षणाकरीता परदेशात दौरा केलेल्या विद्यार्थ्यांचे अनुभव कथन अशा विविध उपक्रमांमध्ये सहभागी होतील. कार्यक्रमाच्या अखेरीस पॅनेल चर्चेद्वारे कृषि, पशुवैद्यक व इतर सहयोगी विज्ञान शाखेमध्ये उद्योजकता बळकट करण्याकरीता शिफारसी तयार करण्यात येतील.परिषदेच्या उद्घाटनाकरीता भाकृअप चे उपनिदेशक डॉ. आर. सी. अग्रवाल हे प्रमुख पाहुणे तसेच ए.एस.आर.बी, नवी दिल्ली चे माजी अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, डॉ. पंदेकृवि, अकोला चे कुलगुरु डॉ. शरद गडाख आणि प्रकल्पाच्या राष्ट्रीय समन्वयक डॉ. अनुराधा अग्रवाल हे विशेष अतिथी म्हणुन प्रामुख्याने उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील हे राहतील.

# रेल्वे तिकीट वितरकाची प्रवाशांशी अरेरावी



**रेल्वे प्रशासनाचे अभय**

रेल्वे तिकीट वितरण कर्मचारी रोज प्रवासासोबत भांडतो, वादविवाद करतो ,कर्मचाऱ्यांची तक्रार अनेक वेळा रेल्वे स्थानक व्यवस्थापक मुदलियार यांच्याकडे करण्यात आली. त्यावर कारवाई होत नाही. गाडी फलाटावरून सुटण्यापूर्वी प्रवासाला तिकीट देणे अनिवार्य आहे. तेथे तसे होत नाही त्याला प्रशासनाचे अभय असल्याची चर्चा हल्ली जोरात आहे.

**पुलगाव । प्रतिनिधी**

रेल्वे तिकीट वितरण करणारा कर्मचारी महिला ,पुरुष व विद्यार्थी प्रवाश्यांबरोबर रोजच वाद घालत असल्याने व त्याची तक्रार करून कारवाई होत नसल्याने प्रवासी वैतागले आहे सदर कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे .

पुलगाव शहर व नाचणगावची लोकसंख्या एक लाखाच्या जवळपास आहे .रेल्वेने प्रवास सोयीस्कर असतो म्हणून अनेक प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. सकाळी तिकीट काढण्यासाठी कर्मचारी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना रांगेत उभे राहावे लागते. सकाळी तिकीट वितरणाकरिता एकच खिडकी सुरू राहते व रांगेत उभे राहावे लागते. दुसरी खिडकी सकाळी आठ वाजेनंतर उघडते. इंटरसिटी एक्सप्रेस, नागपूर पुणे एक्सप्रेस,मेल,विदर्भ इत्यादी गाड्या याच वेळेत धावतात. रोज मजुरी करिता ,दैनंदिन कामाकरिता ,शिक्षण, आरोग्य, व्यापार इत्यादी कामाकरिता जाणारे व नोकरदार वर्ग याची संख्या लक्षणीय असून ते वर्धा, नागपूर, धामणगाव ,अमरावती या शहरात जातात. रोज तिकीट विक्री करणारे कर्मचारी चिल्लर पैशासाठी प्रवाशासोबत वाद घालतात. आरक्षण काऊंटर सुरू असताना साधारण काऊंटर वर बरेचदा कर्मचारी नसतात.त्यामुळे प्रवाशांची तारांबळ उडते.गाडीच्या वेळेवरच येता का .एक तास आधी यायला काय होते. असे उद्धट प्रश्न कर्मचारी विचारतात.काही कर्मचाऱ्यांना संगणकावर कार्य करण्याची पुरेशी माहिती नाही.काही कर्मचाऱ्यांचे काम इतके हळू आहे की अनेक प्रवाशांना गाडी चुकवावी लागते.अनेकदा उपलब्ध आरक्षण हळू कामामुळे प्राप्त होत नाही.रेल्वे प्रशासन पाच दहा आणि वीस रुपयांच्या नोटा तिकीट विक्री कार्यालयात का ठेवत नाही. हे एक कोडेच आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .